# अजब प्राणी

## वॉल्टर रॉथ्सचाईल्ड आणि त्याच्या म्युझियमची कहाणी

लिटा जज



वॉल्टर रॉथ्सचाईल्ड हा आगळावेगळा मुलगा होता. बँकर्सच्या कुटुंबात जन्माला आलेला तो जगातला बहुतेक सर्वात श्रीमंत मुलगा होता. पण त्याचं आगळेपण हे नव्हतं. वॉल्टर लाजाळू होता आणि कोणाशीच बोलत नसे. त्याला मित्र नव्हतेच, पण सरपटणा-या, उडणा-या आणि चालणा-या प्रत्येक प्राण्यावर त्याचं प्रेम होतं.

वयाच्या सातव्या वर्षी त्यानं प्रथम सर्कसची परेड पाहिली. त्यानं भारावून गेलेल्या अवस्थेत त्यानं आईवडिलांना सांगून टाकलं, मी जगभरातले प्राणी गोळा करुन आणणार आणि एक म्युझियम बांधणार. लवकरच वॉल्टरकडे पहिले भन्नाट प्राणी जमा झाले. कांगारु, किवी आणि वॉलबी. तेव्हापासून त्याच्याकडचा प्राणीसंग्रह वाढतच गेला. रॉथ्सचाईल्ड इस्टेट आणि भोवतालचं तळं त्यांना अपुरं पडायला लागलं. “वॉल्टर.. ” बागेतली पारितोषिकाला पात्र असलेली लिलीची फुलं एक भलीमोठी घोरपड खाताना पाहून त्याची आई एक दिवस किंचाळली. लॉर्ड रॉथ्सचाईल्ड यांना आपल्या मुलानं आपला व्यवसाय सांभाळावा असं वाटत होतं. पण वॉल्टरला आपलं स्वप्न पुरं करायचंच होतं.

“अजब प्राणी” ही कथा एका लाज-याबुज-या मुलानं आपल्या स्वप्नांचा कसा जिद्दीनं पाठपुरावा केला आणि तो एक महान शास्त्रज्ञ बनला त्याबद्दल आहे. जगभरातल्या प्राण्यांमधल्या वैविध्याबद्दलच्या संकल्पनाच त्यानं कायमस्वरुपी बदलून टाकल्या.







वॉल्टर, लॉर्ड नाथन आणि एम्मा रॉथ्सचाईल्ड या दांपत्याचा मुलगा खूप वेगळाच होता. १९६८ साली जन्माला आलेला तो लंडनजवळच्या भल्यामोठ्या इस्टेटीवर वाढला. राजवाड्यासारखं घर आणि हजारो एकरांची बाग असलेल्या त्या ठिकाणी त्याला अनेक गोष्टींचं निरीक्षण करता येत होतं. तिथे कॅक्टसचे प्रकार, ऑर्किडचे प्रकार आणि फक्त राणीच्या वाढदिवसासाठी वाढवायच्या फुलांचे प्रकार जोपासण्यासाठी वेगवेगळे ताटवे होते. वॉल्टरचे वडिल इंग्लंडच्या राणीचे बँकर होते. वॉल्टरचे सगळे नातेवाईकही बँकर्स होते. तो जगातला सर्वात श्रीमंत मुलगा होता. पण ते त्याचं आगळेपण नव्हतं.






वॉल्टर खूप लाजरा असल्यानं मुष्किलीनं एखादा शब्द बोलायचा. शाळेत इतर मुलं यावरुन त्याला चिडवतील अशी त्याच्या पालकांना भीती होती. त्यामुळे त्याला त्यांनी घरीच एका गव्हर्नेसकडून शिक्षण सुरु केलं. पण वॉल्टरचा सगळा वेळ कीडे, पक्षी आणि प्राणी यांचा संग्रह करण्यातच जायचा. बागेतली फुलपाखरं शोधायला त्याला बोलायची गरज नव्हती. त्याला मित्र नव्हतेच, पण सरपटणा-या, उडणा-या आणि चालणा-या प्रत्येक प्राण्यावर त्याचं प्रेम होतं.






एका संध्याकाळी त्याचे वडील रागानं म्हणाले,
“रॉथ्सचाईल्ड घराण्यातल्या मुलाकडून ही अपेक्षा नाहीये. तू नीट वागायला शिक.”
वडिलांचा चढा आवाज ऐकून, वॉल्टरला एखाद्या गोगलगायीसारखं वाटलं – चिमुकली, कवचात स्वत:ला गुंडाळून घेतलेली गोगलगाय.




दुसऱ्या दिवशी आपल्या आईवडिलांचा वाद त्याला ऐकू आला.
“तो अर्धवट आहे”. वडिल ओरडले.
“त्याला एकटं वाटतं..” आई जरा दबक्या आवाजात म्हणाली. “तो बदलेल.”
वडिल रागारागात येरझा-या घालत होते.
“तो आपल्या कुटुंबाचा व्यवसाय कधीच चालवणार नाही. त्याला काहीच जमणार नाही.”

आपल्या वडिलांचं बरोबर आहे याची वॉल्टरला चिंता वाटत होती.

त्याच्या गव्हर्नेसनं त्याला एक दिवस पिकॅडलीत सर्कस परेड पहायला नेलं. तिथे वॉल्टरनं प्रथमच माकड, झेब्रा आणि उंट पाहिले. त्याला खूप मस्त वाटत होतं. प्राण्यांबरोबर त्याचे हातपाय हलत होते आणि पहिल्यांदाच शब्द डोक्यात तरंगायला लागले होते.







घरी पोचताक्षणी तो ओरडला.. “आई, बाबा.. मी जगभरातून प्राणी जमा करुन आणणार आणि एक म्युझियम सुरु करणार. त्याला मी माझं म्युझियम म्हणणार” हे बोलताना त्याला श्वास घ्यायची देखील उसंत नव्हती. यावेळी वडिलांकडे बोलायला एक शब्दही नव्हता.

वॉल्टर तेव्हा फक्त सात वर्षांचा होता, पण त्यानं म्युझियमच्या योजना सुरु केल्या होत्या. नॅचरल हिस्ट्री म्युझियमसारखे त्याच्याकडे प्राण्यांचे स्पेसिमेन असणार होतेच पण जिवंत प्राणीही असणार होते. लंडन झूसाठी जगभरातून शोधून प्राणी आणणारे लोक त्याच्या कुटुंबियांच्या ओळखीचे होते.

“आपल्याला मिळालेल्या हातखर्चातून आपण कांगारु आणणार” असं वॉल्टरनं जाहीर केलं.

“कदाचित यातून त्याचा लाजाळूपणा कमी होईल.” आईनं याचनेच्या सुरात असं म्हणल्यावर वडिलही तयार झाले.

लवकरच इस्टेटीच्या बागेत कांगारु मुक्तपणे फिरताना दिसायला लागले. एका गेमकीपरच्या मदतीनं वॉल्टर त्यांची काळजी घ्यायचा. यात वॉलबी आणि किवीच्या थव्यांची अलगदपणे पडलेली भर त्याच्या पालकांच्या लक्षातही आली नाही. आपल्याकडच्या पक्ष्यांवर वॉल्टरचं प्रेम होतं.







मात्र पारितोषिकाला पात्र ठरलेली
आपली लिलिची फुलं एक मगरीनं
खाताना पाहून त्याच्या आईनं एक दिवस
“वॉल्टर” अशी आरोळी ठोकली.

वॉल्टर १२ वर्षांचा झाला तेव्हा लंडनमध्ये नॅचरल हिस्ट्री म्युझियमची देखणी इमारत उभी राहिली. वॉल्टरनं आपण आत्ता स्वत:च्या बागेतल्या एका कोपर्ऱ्यात जमा केलेल्या गोष्टी अशा भव्य पॅलेस आॅफ वंडर्सच्या इमारतीत असतील अशी एक कल्पना त्यावरुन केली. तो धावत घरी गेला आणि आपण जमा केलेले बीटल्स एकत्र केले. धीर एकवटून त्यानं ते बीटल्स अल्बर्ट गुंथर या म्युझियमच्या झूलॉजी विभागाच्या प्रमुखाला नेऊन दिले. अल्बर्ट हा वॉल्टर्सचा पहिला खरा मित्र आणि मार्गदर्शक ठरला.



वॉल्टरच्या काळात जगातले अनेक प्राणी विज्ञानाला अनभिज्ञ होते. दूरवरची जंगलं, अनेक ठाऊक नसलेली बेटं धुंडाळली गेली नव्हती. तोपर्यंत वॉल्टरच्या मेंदूत त्यानं शोधलेले किडे, पक्षी आणि प्राणी यांचा एनसायक्लोपिडिया जमा झाला होता. पण त्याला न धुंडाळल्या गेलेल्या ठिकाणच्या नवनवीन स्पिशिजची माहिती करुन घ्यायची होती. वॉल्टर त्याच्या अबोलपणामुळे नव्हे तर विलक्षण बुध्दिमान होता म्हणून वेगळा आहे हे अल्बर्टला कळत होतं.





वॉल्टरच्या वडिलांचा मात्र आपल्या मुलाच्या बुद्धिमत्तेवर विश्वास नव्हता. वॉल्टर मोठा व्हायला लागल्यावर त्यानं “किड्यांमध्ये आपला वेळ घालवण्यापेक्षा बँकेत यावं” असा वडिलांनी हुकूम सोडला.


वॉल्टर नाईलाजानं घरच्या ऑफिसमध्ये जायला लागला. आपली स्वप्नं पुरी करणं आता त्याला अशक्यप्राय वाटत होतं.



पण वॉल्टरची म्युझियमबाबतची इच्छा मावळणं शक्य नव्हतं. तो आता कमावता असल्यामुळे दूरच्या प्रदेशातल्या शोधमोहिमांसाठी पैसे जमवू शकत होता. त्यानं मग साऊथ पॅसिफिक समुद्रातल्या नवीन शोधलेल्या बेटांवर पक्षीनिरीक्षणासाठी एका चमूला पाठवलं. त्यासाठी काही सहाय्यकही घेतले. वॉल्टरनं नोकरी सोडायला वडिलांची परवानगी नव्हती. पण त्या चमूतल्या लोकांनी काहीही पाठवलं तरी ते खोका उघडताना वॉल्टर मनोमन तिथल्या समुद्रात पर्यटन करुन येत असे.

वॉल्टरनं पक्षी कसे जतन करायचे त्याचा नीट अभ्यास केला. त्यानं निरनिराळ्या प्रजातींमधले इतके बारकावे आणि फरक शोधले, जे त्यापूर्वी कोणाच्याच लक्षात आले नव्हते. नवीन स्पिशिजबद्दलही त्यानं लिहायला सुरुवात केली. विज्ञानजगतात त्याच्या या शोधांमुळे खळबळ माजली.





वॉल्टरनं ताबडतोब नवीन शोधमोहिमा आखल्या. तिथे पाठवलेल्या भटक्यांनी पक्षी, प्राणी, सरपटणारे प्राणी, मासे आणि जगाच्या कानाकोपऱ्यातून कीटकांच्या प्रजाती जहाजांमधून पाठवायला सुरुवात केली. वॉल्टर आपल्याला लागलेल्या शोधांबद्दल लिहायला लागला. इस्टेटीवरचे जिवंत प्राणी आणि स्पेसिमेन्स यांच्यावर संशोधन करण्यासाठी त्यानं शास्त्रज्ञांना बोलावून घेतलं. त्याच्या संग्रहामुळे जगाबद्दलची माहिती जमवणं याबाबत क्रांती घडली. वॉल्टर २४ वर्षांचा झाला तेव्हा म्युझियमची इमारत पूर्ण होत आली होती.

अखेरीस, त्याच्या वडिलांनी तडतोड मान्य केली. वॉल्टर बँकेत काम करणं सोडणार नाही, पण इस्टेटीवर वॉल्टरच्या वस्तूंसाठी एक इमारत बांधायला त्याच्या पालकांनी परवानगी दिली.



अखेरीस तो सुवर्णदिन उगवला. वॉल्टरनं आपल्या संग्रहालयाचे दरवाजे जगाला खुले केले आणि अभिमानानं तो आपण जमवलेल्या चित्रविचित्र, देखण्या प्राण्यांच्या माहितीचा खजिना सगळ्यांना दाखवायला लागला.



कांगोतले ओकापिस, कोलंबियातले केपीबॅरस बघायला त्यानंतर लोकांच्या तिथे रांगा लागायला लागल्या. प्राचीन काळातल्या महाकाय प्राण्यांच्या फॉसिल्सपासून अनेक चिमुकले किडे बघायला लोक घोळका करायला लागले.

एकट्या माणसानं जमवलेलं या प्रकारातला वॉल्टरचा तो संग्रह जगात सर्वात मोठा होता. विज्ञानाच्या दुनियेल्या त्याच्या योगदानाबद्दल सगळ्यांनाच त्याच्याबद्दल आदर वाटत होता. दोन सहाय्यकांच्या साथीनं वॉल्टरनं १२०० पुस्तकं आणि शोधनिबंध लिहिले, ५००० नवीन स्पिशिज शोधल्या.
रॉथ्सचाईल्ड या नावानं ओळखल्या जाणार्‍या प्रजातींमध्ये आता फुलपाखरं, मासे, पैसा, सरडा, वॉलबी, काही पक्षी आणि चक्क एका जिराफाचा समावेश आहे.
वॉल्टर एक चांगला बँकर कधीच होऊ शकला नाही. तो आयुष्यभर बुजराच राहिला आणि त्यानं लग्नही केलं नाही. पण मोठाली कासवं, मोठे पक्षी आणि इस्टेटीवरचे इतर प्राणी यांच्या संगतीत खुष होता.
यथावकाश, तोही लॉर्ड रॉथ्सचाईल्ड झाला.
म्युझियमला भेट देणा-या लोकांशी तो उदारपणे वागत असे.



पण भावी वैज्ञनिकांसाठी त्यानं आपला संग्रह मुक्तपणे खुला केला हे त्याचं सर्वात मोठं दातृत्व होतं. जगातल्या वैविध्यपूर्ण जिवांबद्दल मानवाच्या ज्ञानात त्या संग्रहानं महत्वपूर्ण बदल घडवले.





